# संगीत–सरिता

(राग कसे ओळखावेत)

**एकशे तेवीस राग व त्यावर आधारित सव्वीसशेच्या वर**
**मराठी व हिंदी गाणी**
**(सोबत आरोह-अवरोह) यांचा एकमेव संग्रह**

डॉ. विठ्ठल श्री. ठाकूर

**तन्मय प्रकाशन**
माशेल – गोवा

# मनोगत :

मी गात नाही, मला आवाजाची देणगी नाही, स्वरास्वरातील सूक्ष्म फरक मला कळत नाही. पण मी रागदारीत रमतो. मला शास्त्रीय संगीत आवडतं. हे कसं झालं? तर लहानपणी रेडिओवर लागलेला राग ओळखायचा मला छंद लागला. रागदारी संगीताची आवड नाही, पण राग ओळखायचा ही जिद्द, यातून रागदारीची आवड निर्माण झाली. याच मार्गानं माझ्या भावांना, मित्रांना पण शास्त्रीय संगीत आवडू लागले. हा मार्ग इतरांनाही दाखवावा, एवढीच इच्छा या संग्रहामागे आहे. या मार्गानं जाऊन जर कुणाला शास्त्रीय संगीताची आवड निर्माण झाली तर माझ्या पुस्तक निर्मितीच्या कामाचं सार्थक झालं, असं मी समजेन.

प्रस्तावना

# पं. जितेंद्र अभिषेकी

श्री. डॉ. ठाकूर यांच्या या पुस्तकाचा हेतू संगीत चांगल्या तऱ्हेने व बुध्दीग्राह्य पध्दतीने कसे ऐकावे हा आहे. संगीत हे तसे पाहिल्यास शब्दात विषद करून सांगण्याचा विषय नाही. तसा कुणी अभिमानही बाळगू नये. परंतु तरी देखील या बाबतीत काहीच प्रयत्न केले जाऊ नयेत असे देखील कुणीही म्हणणार नाही. या बाबतीत बऱ्याच लोकांचा लेखन दृष्टीकोन हा शिक्षकाचा असतो. तसा दृष्टीकोन डॉ. ठाकूर यानी कुठेही ठेवलेला नाही किंवा अभिनिवेषही बाळगलेला नाही. आपण भोगतो तो स्वरानंद लोकांच्यापर्यंत पोचविण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे व तो स्वागतार्ह आहे. नसल्यास वैद्यकीय व्यवसायात असणारे बरेच लोक किती शुष्क असतात हे आपण पाहतो. डॉ. ठाकूर यानी आपला वेळ खर्च करून या बाबतीत जे डोळस प्रयत्न केले आहेत ते वाखाणण्यासारखे आहेत. संगीत गाणारे लोक संगीताबाबत लिहितात किंवा बोलतात त्यावेळी बऱ्याच गोष्टी ते मुद्दाम होऊन टाळत असतात. म्हणून स्वतः संगीताचा भाग नसलेल्या व्यक्तीकडून एक Detached Educator म्हणून हा विषय मांडला गेला तर तो अधिक प्रभावी होऊ शकतो. त्यामुळे ‘संगीत संस्कृतीचा’ प्रचार व प्रसार होण्यास अधिक मदत होईल. गायक व सामान्य रसिक श्रोता यामध्ये आज असलेली दरी यासारख्या पुस्तकाने बराचशी भरून निघेल व श्रोता गायकाच्या बराच जवळ येऊ शकेल.हे पुस्तक संगीत ऐकण्याच्या दृष्टीने श्रोत्यांची तयारी करून

घेण्यासाठी आहे. संगीत ऐकणारी नवीन पिढी आज तयार होत आहे, जुने तेच सोने असे म्हणून  चालणार नाही याची जाण डॉ. ठाकूर यांनी आपल्या लेखनात ठेवली आहे, हे मुख्य आहे. त्यांनी दिलेली उदाहरणे जुनी व नवीन दोन्ही आहेत. त्यामुळे पुस्तक एकांगी बनलेले नाही. एवढं सर्व साहित्य एकत्र गोळा करणे हाच एक मोठा उद्योग आहे. डॉ. ठाकूर यांनी हा प्रयत्न यशस्वी रितीने केला आहे. याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. सर्व प्रकारे योग्य अशी उदाहरणे देणे किंवा माहिती देणे कुणालाच शक्य नाही. असे असूनही डॉ. ठाकुरांचा हा प्रयत्न स्तुत्य तर आहेच, पण रसिकांना गायनाभिमुख करण्यास बराच यशस्वी होणारा ठरेल यात शंका नाही. तसे पाहिल्यास या पुस्तकात त्रुटी नाहीत असे मी म्हणणार नाही. परंतु संगीत व संगीत ऐकणे या गोष्टी इतक्या मोठ्या आहेत व व्यक्तिगत आहेत की त्याची सर्व अंगे एका पुस्तकात समाविष्ट करणे कुणालाच शक्य नाही. या दृष्टीने पाहिल्यास डॉ. ठाकुरांचा हा प्रयत्न अभिनंदनीय आहे. त्यांना त्यांच्या प्रयत्नात मी सुयश चिंततो.

## कौतुक

# पु. ल. देशपांडे

संगीत सरिता ह्या सदरातून तुम्ही रागांची ओळख करून देण्याचा खूप परिश्रमपूर्वक प्रयत्न केला आहे. From the known to the unknown हा शिक्षणक्षेत्रातला महत्त्वाचा मंत्र आहे. लोकांच्या कानावर नाटयसंगीत पडत असते. अशावेळी तो आधार धरून राग संगीताकडे त्या श्रोत्यांना नेण्याचा तुमचा प्रयत्न आहे. रागांचे नोटेशन देऊन तुम्ही त्या रागाचे शास्त्रशुद्ध लक्षणही दाखवून दिले आहे. संगीताकडे केवळ एक फावल्या वेळात करमणूक करण्याचे साधन म्हणून न पाहता, एक रीतसर अभ्यास म्हणून पाहणाऱ्यांना तुमच्या लेखांचा उपयोग होईल.

**– पु. ल. देशपांडे**

## १. पुस्तकाचे प्रयोजन

शास्त्राची फार मोठी परंपरा असलेल्या 'संगीत' विषयावर, त्या विषयाचा तज्ज्ञ नसलेल्या माझ्यासारख्या माणसानं केलेला हा संग्रह आहे. त्यामुळे एक गोष्ट लक्षात यावी की, हे पुस्तक संगीत शिकणाऱ्यांसाठी व संगीततज्ज्ञांसाठी, संगीत तज्ज्ञांकडून लिहिल्या गेलेल्या पुस्तकासारखं क्लिष्ट असणार नाही आणि तसं ते क्लिष्ट नाहीही. रेडिओवर रोज लागणारी गाणी ऐकणाऱ्या कुणाही व्यक्तीला या पुस्तकाच्या आधारे थोडयाशा प्रयत्नाने राग ओळखता येऊ शकतील आणि शक्य आहे की, शास्त्रीय संगीत न आवडणाऱ्या लोकांत, माझ्यात जशी आवड निर्माण झाली तशी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण होऊ शकेल.

हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीताचं विश्व अफाट आहे. त्या विश्वाचा आनंद अनेक लोक घेताहेत. पण हे लोक त्या विश्वातले कमी अधिक प्रमाणातले तज्ज्ञ आहेत. तुमच्या-आमच्यासारख्यांना तर ते फार दूर असल्यासारखे वाटतात. शास्त्रीय संगीत म्हणजे काहीतरी 'आपणासाठी नसलेलं', अशी सामान्य लोकांची समजूत झालेली आहे. त्यात चूक कुणाचीही नाही, हे मान्य करूनही, या दोघांमध्ये पूल बांधायची गरज आहे. हे काम हा संग्रह करण्याचा प्रयत्न करणार आहे.

## २. संग्रहाची प्रेरणा

संग्रह तयार होईपर्यंतची वाटचाल कशी झाली, हे जेव्हा मी मागं वळून बघतो, तेव्हा 'त्याची प्रेरणा मला कशी मिळाली?' या प्रश्नाकडे मी पोचतो. त्याबद्दल मी इथं लिहिलं तर, राग ओळखण्याच्या प्रक्रियेची ती सुरूवात असल्यामुळे वाचकांना ते अप्रस्तुत वाटणार नाही याची खात्री आहे.

आमच्या घरी माझे चुलते दाजीकाका रेडिओवर शास्त्रीय संगीत ऐकत असत. मी ज्यावेळी ''गाणी लावा'' असा आग्रह धरत असे, तेव्हा ते विचारत , ''या रागदारीच्या चालीवरचं कुठचं गाणं तुला

आठवतं?'' मग मला किमान पाच दहा मिनिटं तरी तो ख्याल ऐकत रहावा लागे. मग मी एखादं गाणं सांगत असे. ते जर त्या रागावर आधारित असेल तर ते, ''शाब्बास'' म्हणून त्या रागाचे नाव सांगत. (राग ओळखण्याच्या याच पध्दतीवर हे पुस्तक आधारित आहे.)

दिवस असेच जात होते. वर्षभरात मी पंचवीस तीस राग ओळखू लागलो. हलके हलके माझ्यात शास्त्रीय संगीताची आवड निर्माण झाली. याच पध्दतीने माझे भाऊ व चारपाच मित्र पण मी बिघडवले.

**'आम्ही बिघडलो, तुम्ही बिघडाना'**

हे पु. ल. देशपांडे यांचे वाक्य मला या ठिकाणी आठवतंय. आमच्या प्रमाणे तुम्हीही या संग्रहाच्या आधारे राग ओळखू शकता. संगीताच्या या विश्वात कुणीही सर्व पादाक्रांत करू शकलेले नाहीत. काहीनी या संगीत सरोवरात आंघोळ केली, काहींनी बुचकळी मारली. या पुस्तकाच्या आधारानं, आम्ही निदान ते सरोवर अवलोकन तरी करू शकू.

पुढील पानात राग कसे ओळखावेत (योग्य शब्दात सांगायचं झाल्यास, मी राग कसे ओळखतो) याचं विवेचन केलं आहे, ते बुजुर्गांना पसंत पडेल की नाही शंका वाटते. कारण खूपदा शास्त्र सोपं करून सांगितलं की, 'शास्त्रज्ञा'ना राग येतो. त्यांच्यासाठी लिहिलेलं 'माफीपत्र' (पृ. १६८) त्यांनी जरूर वाचावं. ते मला क्षमा करतील याची मला निश्चितच खात्री आहे.

**३. गाण्याच्या आधारे राग कसे ओळखाल?**

याबद्दल लिहिण्यापूर्वी संग्रह कसा तयार होत गेला याबद्दल दोन शब्द लिहितो.

गेल्या सात आठ वर्षातील माझ्या छंदाला मिळालेलं हे शब्दरूप आहे. पूर्वी लिहिल्याप्रमाणे मी ख्याल ऐकत होतो. ते ऐकता ऐकता त्यावरून आठवलेलं गाणं टिपून ठेवलं. नंतर ते पेटीवर वाजवून घेऊन, त्याची सुरावट लिहून घेतली व त्या रागाच्या सुरावटीशी ती ताडून

पाहिली. मग ते गाणं 'त्या रागावर आधारित'असं संग्रहीत होत गेलं. नंतर दरवेळी तो राग लागल्यावर ते पक्कं केलं गेलं. या संग्रहातील बहुतेक गाणी अशा पध्दतीनं पक्की केली आहेत.

अर्थातच संग्रह म्हटला की तो जमेल तितका परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातोच. अनेक गाणी अशा पध्दतीनं संग्रहित झालेली आहेत. (उदा. हिंदी गाणी)पण या गाण्यापेक्षाही प्रचलित असलेल्या नाटयगीतांच्या आधारानं राग ओळखणं सोपं जातं, असं माझं स्पष्ट मत आहे.

**मी राग कसा ओळखतो ?**

याची पध्दत जर मी सांगितली तर त्याच पध्दतीनं तुम्हांला पण राग ओळखता येतील. एखादा राग तुम्ही ऐकता आहात. ऐकता ऐकता, तुम्हाला एखाद्या गाण्याची धून आठवेल. ते गाणं कुठल्या रागावर आधारित आहे ते पुस्तकात शेवटी दिलेल्या सूचीमध्ये बघायचं, रागाचं नाव लक्षात ठेवायचं, राग शेवटपर्यंत ऐकायचा. शेवटी 'राग कोणता' ते सांगितलं जातं, त्याच्याशी तुमचा अंदाज ताडून पाहायचा. तुमचा अंदाज बरोबर ठरला तर, तुम्हाला मनोमन आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. त्या आनंदासाठी तरी तुम्ही ख्याल गायकी ऐकू लागाल. हलकं हलकं ते विश्व तुम्हाला ओळखीचं वाटू लागेल. काही काळानंतर तुम्हाला पुस्तक पाहायची पण गरज पडणार नाही. तुमच्यापुरतं त्या रागातलं एक गीत मनात पक्कं बसलं की बस्स! तो राग लागला की तुम्हाला तेच गीत आठवेल.

हलके हलके तुम्हाला जास्त जास्त राग ओळखता येतील.

दुसरी गोष्ट, रागांचे आरोह-अवरोह दिलेत. तुमच्याकडे हार्मोनियम असेल तर, तुम्ही ती सुरावट वाजवून पहा. म्हणजे राग स्वरास्वरानं तुमच्या मनात पक्का होईल. त्याखाली रागाची वेळ दिली आहे. राग ओळखताना तिचा पण काही प्रमाणात उपयोग होऊ शकतो. उदा. ललत, तोडी, भैरव सारखे राग सकाळी लागतात, म्हटले जातात.

भीमपलास, सारंग सारखे राग दुपारी.

**तुम्ही या संग्रहात भर घालू शकता.**

हा संग्रह तसं पहायला गेल्यास गरज भागवेल, पण तसा तो अपुराच आहे आणि तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी अपुराच राहणार आहे. कारण हे शास्त्रच मुळी अफाट आहे. स्वरातील कोमल-तीव्रतेच्या किंचित फरकाने मालकंसचा चंद्रकंस होतो व भीमपलासाचा पटदीप.

म्हणून तुम्हाला एखादं गाणं राग ओळखताना सुचलं व ते या संग्रहात नसलं, तर समजा तुम्हाला एक नवीन गाणं मिळालंय. त्या गाण्याबद्दल जाणकाराकडून खात्री करून घ्या अन् खात्री झाली की, ते गाणं संग्रहात दाखल करून घ्या. अशाच तऱ्हेनं नवीन रागही तुम्हाला मिळू शकतील.

**१) अडाणा**

१. कांता वंचिता, नि पतिता संसारी (अमृतसिद्धी)
२. जठरानल शमवाया नीचा (शारदा)
३. जनाई करितसे हरी भजन (अभंग - संत जनाबाई)
४. झणी दे कर या दीना (एकच प्याला)
५. धरी धवल यशाची मम धाम (विधिलिखित)
६. धिक्कार मन साहिना (मानापमान)
७. पशुमात्र खचित गणला (श्री)
८. माता न तू वैरिणी (गीत रामायण - सुधीर फडके)
९. सुखाने रमाया जरी सांडिन विभवा(सत्तेचे गुलाम)
१०. सोडिला प्रखर शर (सज्जन)
११. स्वकर शपथ वचनी वाहिला (शाम कल्याण; संशयकल्लोळ)
१२. हे सागरा, निलांबरा (रंगात रंगला श्रीरंग - राम मराठे)

१. *आ भी जा रसियाँ* (फुलन की सेज - मन्ना डे, लता)
२. *जब इश्क कही हो जाता है (आरजू - मुबारक बेगम, आशा)*
३. *जैसी करनी, वैसी भरनी (नितिन मुकेश)*
४. *झनक झनक पायल बाजे*
*(झनक झनक पायल बाजे - अमिर खाँ)*
५. *मन मोहन मन में, हो तुम्ही (कैसे कहूँ- रफी, बातीश, सुमन)*
६. *लपक झपक तू आ रे बदरियाँ (बूट पॉलीश - मन्ना डे)*
७. *सावरे, मत जा (मीरा श्याम - लता)*

| | |
|---|---|
| आरोह | - **सा रे म प ध् नि् सां** |
| अवरोह | - **सां ध् नि् प म प ग् म रे सा** |
| वादी | - **सा,** संवादी - **प** |
| वेळ | - **रात्र, तिसरा प्रहर** |

**२) अभोगी**

१. तुला ते आठवेल का सारे (सुमन कल्याणपूर)
२. धनसंपदा, न लगे मला ही (मेघमल्हार - राम मराठे)
३. पंढरीचा वास चंद्रभागे स्नान (संत नामदेव - भीमसेन जोशी)
४. मज सुचले ग, सुचले, मंजुळ गाणे (पाहू रे किती वाट - आशा)
५. शंकरा करुणाकरा (धन्य ते संताजी धनाजी - आशा)

*१. कान्हा बजाए बांसुरी (नास्तिक - लता)*

| | |
|---|---|
| आरोह | - **सा रे ग् म ध सां** |
| अवरोह | - **सां ध म ग् रे सा** |
| वार्दी | - **सा,** संवादी - **म** |
| वेळ | - **प्रातःकाळ** |

**३) अभोगी कानडा**

*१. जिया लागे क्या करू सजना (सौ साल बाद - लता)*
*२. ना जैय्यो रे सौतन घर सैय्या (कागजकी नाव - आशा)*

| | |
|---|---|
| आरोह | - **सा रे ग् म ध सां** |
| अवरोह | - **सां ध म ग् म रे सा** |
| वादी | - **म,** संवादी - **सा** |
| वेळ | - **मध्यरात्र** |

**४) अमृतवर्षिणी**

१. लेवू कशी वल्कला
(धाडिला राम तिने का वनी - आशा खाडिलकर)

| | |
|---|---|
| आरोह | - **सा ग मं प नि सां** |
| अवरोह | - **सां नि प म ग सा** |
| वेळ | - **संध्याकाळ** |

सदर पुस्तक विकत घेण्यासाठी संपर्क :


**तन्मय प्रकाशन,**

**द्वारा : विठ्ठल ठाकूर**

'मैफल', घर नंबर ७९७, गणपती वाडा,

देवळाय, खांडोळा, माशेल-गोवा. पिन : ४०३१०७.

दूरध्वनी : ०८३२-२२८८९९०

भ्रमणध्वनी : ९८२२९८३९९०

ईमेल : vithal.thakur@rediffmail.com

**अथवा**

**सुमेधा ठाकूर**

देवळाय, खांडोळा-गोवा

भ्रमणध्वनी : ९८८१९०७८७१/९२२५९०७०४३